# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** महाडिबीटी पोर्टलवरून विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय स्तरावरून पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...
**संदर्भ:-** मा. सहसंचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.उशिसं/शिष्य २०२१/डीबीटी/१२४४९ दि. २५/१०/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून **सन २०२०-२१ करिता** महाडिबीटी पोर्टलवरून पात्र विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याकरता **दि. ३१ ऑक्टोंबर,२०२१ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली असून यापुढे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही तसेच महाविद्यालयांकडून (क्लर्क व प्राचार्य स्तरावरुन) प्रलंबित अर्जांचा नियमित निपटारा होणे आवश्यक आहे.**

तरी सोबत जोडलेले संदर्भांकित पत्र अवलोकनी घेवून **विहित कालमर्यादेत** महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करावी व या अनुषंगाने भविष्यात उद्‌भवणाऱ्या अडचणींबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील यांची नोंद घेण्यात यावी.

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत- वरीलप्रमाणे 27 OCT 2021
संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 697

C:\Users\admin\Downloads\Circular 2019 (2) (2).docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९

फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य २०२१/डीबीटी/ 12549 दि. २१.१०.२०२१

तात्काळ ईमेलद्वारा

25 OCT 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय :- महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबावत.

उपरोक्त विषयाबाबत राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

**सन २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी दि. ३१.१०.२०२१ पर्यंत** मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था/ विद्यापीठ यांचेमार्फत कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांनी भरलेले शिष्यवृत्ती अर्ज संस्था तसेच विभाग स्तरावरुन दररोज निकाली काढणे आवश्यक आहे, कोणत्याही परिस्थितीत संस्था तसेच विभाग स्तरावर अर्ज प्रलंबित टेऊ नयेत. प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. इन्स्टियुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होत नाही.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीद्वारे आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यात येतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे बँक खातेशी आधार संलग्न नाही अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी त्वरीत बँक खातेशी आधार संलग्न करावे.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

Santosh Wangan

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

त्वरित कार्यवाही

26/10

SSV/535
26/10/21


Shivaji University, Kolhapur
Inward No 2444
Date 26/10/2021